नि.फौ.प्र.क्र. ३०१०१५६/२००२

सरकार वि. कैलाश

**नि.क्र. ७**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे आरोपीच्या गैरहजेरीत</u>**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ यांची शपथेवर सरतपासणी सुरु</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

माझे नाव – अनंता पंढरीनाथ तिमरामजे,

वय – ४९ वर्षे,

धंदा – खाजगी,

पत्ता – सहकार नगर, नागपूर.

**<u>सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती संगीता गोगे यांच्याकडून</u>**

मी सन २००२ मध्ये इंडियन एक्सप्रेस येथे काम करत होतो. मी माझ्या कंपनीची कॅश अंदाजे दीड लाख रुपये बँकेत नेत असतांना माझ्या ऑफीसच्या समोर मला ढकलुन व माझी गाडी पाडुन छातीवर बुक्की मारुन बॅग हिसकण्याचा प्रयत्न केला. तेवढयात ट्रॅफीक पोलीस आले व त्यांनी एकाला पकडले. बॅगमध्ये कंपनीचे पैसे, डी.डी. होते. ते पैसे मला १५ ते २० दिवसांनी मला परत मिळाले आहे. आता मला रिपोर्ट व छापील खबर मला दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. **नि. पी–१ व नि.पी–२** देण्यात येते. मी आरोपींना ओळखत नाही. त्यामुळे मला केस चालवायची नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत** **माझे समक्ष,**

नागपूर (श्रीमती टी. एन. जाधव)
दिनांकः– २१.०४.२०२५ मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर